महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड, ४ था मजला, प्लॉट जी-९, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
Email : ciro@mahadiscom.in website : www.mahadiscom.in दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११
सी. आय. एन. नं. U४०१०९MH२००५SGC१५३६४५९

जा.क्र. औसंवि/ब/किमान वेतन/ No 26486 दिनांक : 19 SEP 2019

## परिपत्रक

**विषय :** कंत्राटदारांमार्फत कार्यरत कंत्राटी कामगारांना सध्याच्या मुळ वेतनाच्या २०% रक्कम पूरक भत्ता म्हणून अदा करणेबाबत.

**संदर्भ :** परिपत्रक क्र. औसंवि/ब/किमान वेतन/२२५९६ दि. १३/०८/२०१९.

****

शासनाचे उप सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दि.२४ जुलै २०१९ रोजी निर्गमित केलेल्या अधिसूचनानूसार मुंबई दुकाने व आस्थापना उद्योगातील अनुसुचि करीता किमान वेतन अधिनियम, १९४८ मधील तरतुदीनुसार कंत्राटदारांमार्फत कंत्राटी पध्दतीवर काम करणाऱ्या कामगारांचे किमान वेतनाचे दर दि. २४/०७/२०१९ पासून पुनर्निधारित केले आहे. त्यानुसार, संदर्भीय परिपत्रकान्वये, महावितरण कंपनीमध्ये कंत्राटदारांमार्फत कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या कामगारांना सुधारीत दराने मूळ किमान वेतन दि. २४/०७/२०१९ पासून लागू करण्यात आले आहेत.

कंत्राटारांमार्फत कार्यरत कंत्राटी कामगारांना मासिक वेतनात वाढ देण्याबाबतचा प्रस्ताव प्रशासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार, मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक (महावितरण) यांनी संचालक (वित्त), संचालक (संचालन), संचालक (प्रकल्प), संचालक (वाणिज्य) व संचालक (मानव संसाधन) यांचेशी विचारविनिमय करुन महावितरण कंपनीतील कंत्राटदारांमार्फत कार्यरत कंत्राटी कामगारांना सध्याच्या मुळ वेतनाच्या २०% रक्कम पुरक भत्ता म्हणून मासिक वेतनासोबत अदा करण्याबाबत मंजूरी प्रदान केली आहे.

**मुळ वेतनाच्या २०% रक्कम पुरक भत्ता म्हणून अदा करावयाच्या दराचा परिमंडळनिहाय तक्ता खालीलप्रमाणे राहील.**

| कामगारांची वर्गवारी | दि. ०१/१०/२०१९ पासून मुळ वेतनाच्या २०% रक्कमेच्या पुरक भत्त्याचा दर रुपयामध्ये | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | परिमंडळ- १ | | परिमंडळ - २ | | परिमंडळ - ३ | |
| | मुळ वेतन | २०% पुरक भत्त्याची रक्कम | मुळ वेतन | २०% पुरक भत्त्याची रक्कम | मुळ वेतन | २०% पुरक भत्त्याची रक्कम |
| कुशल | ११,६३२/- | २,३२६/- | ११,०३६/- | २,२०७/- | १०,४४०/- | २,०८८/- |
| अर्धकुशल | १०,८५६/- | २,१७१/- | १०,२६०/- | २,०५२/- | ९,६६४/- | १,९३३/- |
| अकुशल | १०,०२१/- | २,००४/- | ९,४२५/- | १,८८५/- | ८,८२८/- | १,७६६/- |
| उपरोक्त वेतना व्यतिरिक्त संदर्भीय परिपत्रकात नमूद केलेले इतर पात्र भत्ते कंत्राटी कामगारांना देय राहील. | | | | | | |

सबब, सर्व संबंधितांना याद्वारे निर्देशित करण्यात येते की, आपल्या अखत्यारीत कंत्राटदारांमार्फत कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या कामगारांना **दि.०१/१०/२०१९ पासून** उपरोक्तप्रमाणे मुळ वेतनाच्या २०% रक्कम पुरक भत्ता म्हणून मासिक वेतनासोबत देण्यात यावा. तसेच, संबंधित कंत्राटदारामार्फत कार्यरत कंत्राटी कामगारांचे वेतन आधार कार्डशी संलग्न असलेल्या बँक खात्यावर दरमहा जमा केल्याची खात्री करावी.

सदरचे परिपत्रक महावितरण कंपनीच्या Employee Portal वरील Circular (I.R. Department) येथे उपलब्ध असून त्यांची मुद्रांकित प्रत प्रसारीत करण्यात येणार नाही.

(चंद्रशेखर येरमे)
कार्यकारी संचालक (मासं)

प्रत :
प्रेषण यादी प्रमाणे महावितरण कंपनीतील कार्यकारी अभियंता स्तरापर्यंत.